# महावितरण विद्युत वार्ता

■ वर्ष:१८ ■ अंक: ६ ■ ऑक्टोबर २०२३ ■ पाने: ८


## हितगूज



**श्री. लोकेश चंद्र**
**अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक**

आपल्या कंपनीत प्रत्येक वर्षी आपण कर्मचारी व अधिकारी यांच्या कार्याचे अवलोकन करीत असतो व आर्थिक वर्षाच्या शेवटी यावरून त्यांच्या वार्षिक गोपनीय अहवालाची नोंद केली जाते. यासाठी पूर्वी केआरएची जी मापदंड व निकष ठरविण्यात आले आहेत त्यात आता बदल करण्यात येत असून यापुढे इज ऑफ डुइंगचे निकष लावण्यात येणार आहे. या निकषात प्रामुख्याने मागणीची वसुली, थकबाकी व देयके याचे निकष लावून मासिक प्रगती अहवाल तयार करण्यात येणार आहेत. म्हणजेच प्रत्येक महिन्यात गोपनीय अहवालासाठी गुणांची नोंद करण्यात येणार आहे व वर्षाच्या अखेरीस या गुणांची गोळाबेरीज करूनच गोपनीय अहवाल ठरविला जाईल. हे गोपनीय अहवाल वस्तुनिष्ठ व पारदर्शक राहणार असून यातून खऱ्या गुणांची पारख होणार आहे.

ग्राहकांना नवीन वीज जोडण्या कृतिमानकाने निश्चित केलेल्या वेळेच्या आत देणं गरजेचं आहे. उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांच्या 'ईज ऑफ लिव्हिंग'च्या सूचनेनुसार जुन्या घराच्या व दुकानाच्या खरेदीनंतर आपोआप वीज कनेक्शन नव्या मालकाच्या नावावर करण्यासाठी मुद्रांक शुल्क व नोंदणी विभागाशी महावितरणची आयटी सिस्टिम जोडली आहे. यात जुने घर / दुकान खरेदी केल्यावर चेंज ऑफ नेम बाबत ग्राहकांनी संमती दिल्यावर महावितरणकडून ग्राहकांला ताबडतोब एसएमएस पाठविला जातो. जर ग्राहकांनी ६० दिवसात पैसे भरले नाही तर त्यानंतर आपोआप अर्ज रद्द होतो.

एखादे जुने घर किंवा दुकान खरेदी केल्यानंतर त्याचे विजेचे कनेक्शन जुन्या मालकाकडून नव्या मालकाच्या नावावर होण्यासाठी ग्राहकांची धावपळ बंद होऊन आपोआप कनेक्शन धारकाच्या नावात बदल होण्यासाठी महावितरणने माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून ही नवीन व्यवस्था नुकतीच सुरू केली आहे. याबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण होणे आवश्यक आहे. यासाठी मुद्रांक शुल्क व नोंदणी विभागाच्या आवारात पोस्टर्स व बॅनर्स लावून प्रसिद्धी करणे गरजेचे आहे. यापुढे चालू मागणी व थकबाकीची वसुली याच्या आधारावरच मासिक वसुलीचे मापदंड निश्चित केला जाईल. येत्या तीन महिन्यांच्या कालावधीत न चुकता सगळी थकबाकी वसूल झालीच पाहिजे. यासाठी प्रत्येक महिन्यात एकूण थकबाकीच्या किमान ३० टक्के थकबाकी वसूल करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आलेले आहे.

बांधकामाच्या ठिकाणी असलेल्या वीज जोडण्यांची काळजीपूर्वक तपासणी करावी. तसेच त्याला कोणता दर लावण्यात आलेला आहे, याचीही खात्री करावी. मीटर बदल करण्यात आलेले असल्यास त्याची ताबडतोब नोंद करून बिलिंग सिस्टीममध्ये समाविष्ट होणे गरजेचे आहे. एकही मीटर यापुढे बिलिंग सिस्टीमच्या बाहेर ठेवणे परवडणारे नाही, याची नोंद घ्यावी.

वीज ग्राहकांना त्यांच्या मर्जीनुसार वीज वापराचा खर्च निश्चित करण्याचा अधिकार देणारे प्रीपेड स्मार्ट मीटर राज्यभर बसविण्याची तयारी सुरू झाली असून काही महिन्यात हे मीटर टप्याटप्प्याने कार्यरत होतील. राज्यातील महावितरणच्या २ कोटी ४१ लाख ग्राहकांचे सध्याचे पारंपरिक मीटर बदलण्यात येणार असून त्या ऐवजी प्रीपेड स्मार्ट मीटर बसविण्यात येतील. स्मार्ट मीटर बसविल्यावर वीज ग्राहक मोबाईल फोनप्रमाणे विजेसाठी पैसे भरून वीज वापरतील. या मीटरचा वापर करून ग्राहकाला नियोजन करून विजेवरील खर्च पूर्णपणे नियंत्रणात ठेवता येईल

उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांनी वीज ग्राहकांना दर्जेदार, गुणवत्तापूर्ण व ग्राहकाभिमूख सेवा देण्याची सूचना केली आहे. त्यानुसार ग्राहकांना विजेच्या खर्चावर संपूर्ण नियंत्रणाचा अधिकार देणारे प्रीपेड स्मार्ट मीटर बसविण्याचे महत्त्वाचे पाऊल महावितरणने उचलले आहे. स्मार्ट मिटरमुळे थकबाकी वसूल करण्यासाठी लागणारे श्रम वाचतील. थकबाकी कमी झाल्याने वीजेचे दरही कमी होऊन शेवटी याचे लाभार्थी हे ग्राहकच असतील. म्हणून ग्राहकांना याचे महत्त्व पटवून दिले पाहिजे व याबाबत जागरूकता निर्माण केली पाहिजे.

वीज ही मूलभूत गरज असल्याने ग्राहकांना सर्वोत्तम सेवा देणे हे आपले कर्तव्य आहे. त्यांच्या तक्रारींचा वेळीच निपटारा करण्यासोबतच थकित वीजबिल वसुलीसही प्राधान्य दिले पाहिजे. पायाभूत सुविधांची गरज नसलेल्या भागात २४ ते ४८ तासात नवीन वीज जोडणी दिली पाहिजे. तसेच दर्जे दार वीजपुरवठ्यासाठी सर्वांनी तत्पर राहून प्रलंबित कामांचा तातडीने निपटारा करून ग्राहक सेवा उंचावणे आवश्यक आहे. अचूक वीजबिल दिल्यास मोठ्या प्रमाणात ग्राहकांच्या तक्रारी कमी होतील. ऑक्टोबर चालू झाल्यानंतर शेतकऱ्यांनी सिंचनासाठी विजेचा वापर मोठ्या प्रमाणावर चालू केलेला आहे. यामुळे रोहित्र नादुरुस्त होण्याचे प्रमाण वाढू नये, याबाबत खबरदारी घेतली पाहिजे. तसेच नादुरुस्त रोहित्रे त्वरित बदलून शेतकऱ्यांचा वीज पुरवठा पूर्ववत करणे क्रमप्राप्त आहे.

आरडीएसएस अंतर्गत पायाभूत सुविधा आराखडा उभारणीची विविध कामे हाती घेण्यात आलेली आहे. ग्राहकसेवा सुधारण्यासाठी त्याचा फायदा होणार आहे. त्यामुळे या योजनेअंतर्गत करण्यात येणारी सर्व कामे वेळेत व गुणवत्तापूर्ण करण्यात येईल याची प्रत्येकांनी खात्री करावी.

सध्या सणासुदीचे दिवस आहेत. आपण गणेशोत्सव, दुर्गाउत्सव व दसरा मोठया आनंदाने साजरा केलेला आहे. या काळात आपण ग्राहकांना अखंडित व सुरळीत वीजपुरवठा दिला. आता प्रकाशाचा उत्सव म्हणजेच दिवाळी आपण साजरी करणार आहोत. या काळात ग्राहकांना दर्जेदार वीजपुरवठा झाला पाहिजे, याचा आपण कटाक्ष बाळगला पाहिजे. या आनंदाच्या सणात नागरिकांना उत्कृष्ट सेवा देऊन त्यांचा आनंद आपण द्विगुणित करू या.

**दिवाळीच्या सणानिमित्त**
**आपणा सगळ्यांना हार्दिक शुभेच्छा.**

# अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळाच्या स्पर्धेत महावितरणच्या संघास सर्वसाधारण विजेतेपद



सर्वसाधारण विजेतेपद पटकावलेला महावितरणचा संघ

**पंजाबमधील** पटियाला येथे नुकतेच संपन्न झालेल्या ४५ व्या अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळाच्या मैदानी स्पर्धेत महावितरणच्या संघास सर्वसाधारण विजेतेपद मिळाल्याबद्दल महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी विजयी संघाचे अभिनंदन केले आहे. दिनांक १३ व १४ ऑक्टोबर या कालावधीत पंजाबातील पटियाला या शहरात आयोजित या अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळाच्या मैदानी स्पर्धेत महावितरणच्या संघाने एकूण पाच सुवर्ण, तीन रौप्य व चार कांस्य पदके पटकावली. या स्पर्धेचे आयोजन पंजाब स्टेट पॉवर कॉर्पोरेशन लि. यांनी केले होते.

या स्पर्धेत महावितरणच्या गुलाबसिंग वसावे यांनी १०० मीटर, २०० मीटर धावणे व ४०० मीटर अडथळा स्पर्धेत तीन सुवर्ण पदके पटकावली तर सचिन चव्हाण यांनी भाला फेक व प्रवीण बोरावके यांनी गोळा फेक या स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले. धावण्याच्या ४ x १०० रिले स्पर्धेत गुलाबसिंग वसावे, संभाजी जाधव, साईनाथ मसने व शुभम निंबाळकर यांनी रौप्यपदक प्राप्त केले. त्याचप्रमाणे धावण्याच्या ४ x ४०० रिले स्पर्धेत गुलाबसिंग वसावे, विजय भारे, शुभम निंबाळकर व प्रदीप वंजारी यांनी रौप्यपदक प्राप्त केले. तसेच विजय भारे यांनी ४०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत रौप्यपदक प्राप्त केले. या स्पर्धेत हनमंत कदम यांनी हातोडा फेक स्पर्धेत कांस्यपदक प्राप्त केले तर साईनाथ मसने यांनी ११० मीटर अडथळा स्पर्धेत, हनमंत कदम यांनी गोळाफेक, साईनाथ मसने यांनी १०० मीटर धावणे व सोमनाथ कंठीकर यांनी लांब उडी या स्पर्धेत रौप्यपदक प्राप्त केले. या स्पर्धेत महावितरणचा १७ सदस्यीय संघ सहभागी झाला होता. संघाचे प्रशिक्षक म्हणून प्रतिक वाईकर तर संघ व्यवस्थापक म्हणून उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्रीकृष्ण वायदंडे यांनी काम पाहिले. ■

## काटोल विभागातील ३९ कर्मचाऱ्यांनी केला नेत्रदानाचा संकल्प



शिबिराप्रसंगी मार्गदर्शन करतांना कार्यकारी अभियंता श्री.दिपक अघाव.

**काटोल** विभागातील ३९ कर्मचाऱ्यांनी मरणोपरांत नेत्रदान करण्याच्या संकल्प केला. रौशणी फाऊंडेशन नागपूरतर्फे कार्यकारी अभियंता काटोल आणि माधव नेत्रालय, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने काटोल विभागीय कार्यालयात अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी आयोजित नेत्रदान जागरूकता आणि मोफत नेत्र तपासणी शिबिरा प्रसंगी हा संकल्प करण्यात आला.

शिबिराचे प्रास्ताविकातून रौशणी फाऊंडेशनचे श्री.लक्षणे यादव यांनी मरणोपरांत नेत्रदान जागरूकता, उद्देश आणि कार्य याबाबत माहिती दिली. नेत्रदानाची आवश्यकता व महत्व सांगून मरणोपरांत नेत्रदान करण्याचे आवाहन केले. तर श्री. राजेंद्र जैन, श्री. गजानन पाटील व माधव नेत्रालयचे श्री. अनिरुद्ध सोमण यांनी नेत्रदानाविषयी सखोल माहिती देऊन उपस्थितांच्या शंकांचे समाधान केले. याप्रसंगी बोलतांना काटोल विभागाचे कार्यकारी अभियंता श्री.दिपक अघाव यांनी सांगितले की, जास्तीतजास्त लोकांनी मरणोपरांत नेत्रदान केल्यास नेत्रहीन व्यक्तींचे जीवन सुकर करणे शक्य होईल. यावेळी ६० व्यक्तींची नेत्र तपासणी करण्यात आली. ■

## प्रशासकीय वृत्त

### अधीक्षक अभियंता, पदोन्नती



**श्रीमती बिना शिवराम सावंत**
अधीक्षक अभियंता
पायाभूत आराखडा
संभाजीनगर परिमंडल



**श्री.राजेंद्र कैलास गिरी**
अधीक्षक अभियंता
भंडारा मंडल



**श्री.महेंद्र सुमंत ढोबळे**
अधीक्षक अभियंता
पायाभूत आराखडा
नाशिक परिमंडल



**श्री. नरेंद्र देवेंद्र नारायणे**
अधीक्षक अभियंता
पायाभूत आराखडा
नांदेड परिमंडल

### उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत

# ऊर्जा विभाग आणि आयएसईजी फाऊंडेशन यांच्यादरम्यान 'ऊर्जा संक्रमण ब्लू प्रिंट' संदर्भात सामंजस्य करार




करारप्रसंगी उपस्थित उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री श्री.देवेंद्र फडणवीस व सर्व मान्यवर.

**उपमुख्यमंत्री** तथा ऊर्जामंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत ऊर्जा विभाग आणि आयएसईजी (ISEG) फाऊंडेशन यांच्यादरम्यान 'ऊर्जा संक्रमण ब्लू प्रिंट' संदर्भात सामंजस्य करार करण्यात आला.

मंत्रालय येथील दालनात झालेल्या कार्यक्रमास ऊर्जा विभागाच्या प्रधान सचिव श्रीमती आभा शुक्ला, 'महावितरण'चे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र,'महापारेषण'चे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, डॉ. संजीव कुमार, 'महानिर्मिती'चे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक श्री. पी. अन्बलगन, 'महाऊर्जा'च्या महासंचालक कादंबरी बलकवडे, स्वतंत्र संचालक श्री. विश्वास पाठक, आयएसईजी फाऊंडेशनचे संचालक सर्वश्री शिरीष संख्ये, सोहम बसू, अनंत गोएंका हे उपस्थित होते.




**'ऊर्जा संक्रमण ब्ल्यू प्रिंट' संदर्भात सामंजस्य करार**

महाराष्ट्र राज्यासाठी ''ऊर्जा संक्रमण धोरण'' विकसित करणे, आघाडीच्या भारतीय राज्यांसह आणि जागतिक स्तराच्या बेंचमार्क नुसार ऊर्जा संक्रमण थीम निश्चित करणे, मजबूत आणि सर्वसमावेशक जीडीपी वाढ देणे, राज्याचे कार्बन आणि इतर उत्सर्जन लक्षणीयरीत्या कमी करून रोजगार निर्मिती करणे, २०३० आणि २०३५ पर्यंत महाराष्ट्र राज्यासाठी ऊर्जेच्या मागणी आणि पुरवठ्याचा संभाव्य आराखड्याचे प्रारूप तयार करणे, वाढत्या नवीकरणीय ऊर्जेला सामावून घेण्यासाठी आणि ग्रीड पायाभूत सुविधा वाढवुन ''ग्रीन ग्रिड'' संकल्पना विकसित करण्यासाठी राज्य सरकारला मदत करणे, वीज खरेदी करारातील खर्च कमी करणे आणि ३०-४० गिगावॅट अतिरिक्त अक्षय क्षमतेसाठी पुरवठा धोरण तयार करणे, क्षमतेमध्ये (राऊंड द क्लॉक), हायब्रीड इत्यादींचा समावेश करणे, इलेक्ट्रिक बस, बॅटरी चार्जिंग इन्फ्रास्ट्रक्चर धोरणांचे बेंचमार्क आणि पुनरावलोकन करणे, ऊर्जेची कार्यक्षमता वाढवण्यासाठी हरित इमारतींसाठी बेंचमार्क आणि धोरणाचे पुनरावलोकन करणे, 'कचऱ्यातुन संधी' बेंचमार्क आणि धोरणाचे पुनरावलोकन करणे, राज्यात ऊर्जा संक्रमणाला गती देण्यासाठी यंत्रणा आणि संस्थात्मक फ्रेमवर्क तयार करणे तसेच गती देण्यासाठी निधी, यंत्रणा आणि स्रोत सुचवणे, तज्ज्ञांचे बाह्य पॅनेल तयार करून राज्य सरकारला वेळोवेळी मदत करणे, ज्ञानाची देवाण-घेवाण सुलभ करण्यासाठी इव्हेंट,कार्यशाळा, वेबिनार, तज्ज्ञांच्या नेतृत्वाखाली चर्चा इत्यादीसारख्या संयुक्त कार्यक्रमांचे आयोजन आणि अंमलबजावणी करणे, ग्लोबल एनर्जी अलायन्स फॉर पीपल अँड प्लॅनेट, वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम, नॅशनल इन्व्हेस्टमेंट अँड इन्फ्रास्ट्रक्चर फंड प्लॅटफॉर्मसह काम करणे, केंद्रीय विद्युत प्राधिकरण , केंद्रीय विद्युत नियामक आयोग आणि ग्रिड कंट्रोलर ऑफ इंडिया यांचे समवेत काम करणे तसेच मंजूर प्रकल्पांच्या जलद अंमलबजावणीसाठी 'ऊर्जा वॉर रूम' स्थापन करणे याचा यामध्ये समावेश असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. ■

# मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० मधील उपकेंद्रांच्या सक्षमीकरणाची कामे युध्दपातळीवर पुर्ण करा- श्री. संजय ताकसांडे

**शेतीला** दिवसा वीजपुरवठा करण्यासाठी राज्य शासनाकडून राबविण्यात येत असलेल्या मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना -२.० साठी निवड करण्यात आलेल्या नागपूर आणि अमरावती परिमंडलातील उपकेंद्रांसोबतच त्यातून निघणाऱ्या वीज वाहिन्यांच्या सक्षमीकरणाची कामे युध्दपातळीवर पुर्ण करा. या कामांसाठी निश्चित करण्यात आलेल्या कृती मानकांचे तंतोतंत पालन करत ही कामे येत्या नोव्हेंबर पर्यंत पुर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश संचालक (संचालन) श्री. संजय ताकसांडे यांनी दिले.

नागपूरच्या काटोल रोडवरील 'विद्युत भवन' कार्यालयात आयोजित नागपूर आणि अमरावती परिमंडलाच्या आढावा बैठकीत श्री. ताकसांडे बोलत होते. या बैठकीला नागपूर विभागाचे प्रादेशिक संचालक श्री. सुहास रंगारी, नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री दिलीप दोडके, अमरावती परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. ज्ञानेश कुळकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा करणे शक्य होणार आहे. त्यासाठी या दोन्ही परिमंडलातील २५५ उपकेंद्रांमध्ये सौर ऊर्जेसंदर्भात पूर्वतयारीची दुरुस्तीची व सक्षमिकरणाची विविध कामे सुरु आहेत. या बैठकीत श्री.ताकसांडे यांनी कृषी पंपाच्या प्रलंबित वीज जोडण्याचा जिल्हानिहाय आढावा घेतला आणि प्रलंबित कृषी पंपांना वीज जोडणी देण्याच्या कामाला गती देण्याचे निर्देश देत प्रतिक्षा यादी शुन्य करण्याचे देखील सांगितले. इज ऑफ लिव्हिंग नुसार ग्राहकांना गतीमान सेवा देण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

या बैठकीला अधीक्षक अभियंते सर्वश्री हरीश गजबे, अविनाश सहारे अमित परांजपे, राजेश नाईक, प्रदिप घोरुडे, मंगेश वैद्य, सुनिल शिंदे, संजय खंगार, नारायण लोखंडे यांच्यासह नागपूर व अमरावती परिमंडलातील सर्व विभागांचे कार्यकारी अभियंते व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**अकोला परिमंडलातही घेतली बैठक :**

मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना-२.० विषयावर संचालक संचालन यांनी अकोला परिमंडलाअंतर्गत अकोला, बुलडाणा आणि वाशीम जिल्ह्यातील १८३ उपकेंद्रांच्या सक्षमीकरणाची कामे युध्दपातळीवर पुर्ण करण्याचे निर्देश संचालक (संचालन) श्री. संजय ताकसांडे यांनी दिले. बुलडाणा येथे पोलीस मुख्यालयातील 'वसुंधरा' सभागृहात आयोजित अकोला परिमंडलाच्या आढावा बैठकीला नागपूर प्रादेशिक संचालक श्री. सुहास रंगारी, अकोला परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री.दत्तात्रय पडळकर यांच्यासह अधीक्षक अभियंते व कार्यकारी अभियंते उपस्थित होते.

**३३ केव्ही सागवान उपकेंद्राची केली पाहणी :**

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० मध्ये निवडण्यात आलेल्या बुलडाणा तालुक्यातील ३३ केव्ही सागवान उपकेंद्राला संचालक श्री ताकसांडे यांनी भेट



३३ केव्ही सागवान उपकेंद्राची पाहणी करताना संचालक (संचालन) श्री.संजय ताकसांडे सोबत मान्यवर.



आढावा बैठकीला मार्गदर्शन करतांना संचालक (संचालन) श्री. संजय ताकसांडे सोबत नागपूर विभागाचे प्रादेशिक संचालक श्री. सुहास रंगारी व इतर अधिकारी

देऊन उपकेंद्राची पाहणी केली. यावेळी सुरू असलेली देखभाल दुरुस्तीची कामे त्वरीत पुर्ण करण्यासह अनेक उपयुक्त सुचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. यावेळी संचालक श्री.ताकसांडे याच्या हस्ते उपकेंद्रात वृक्षारोपण करण्यात आले.

**३३ केव्ही घारफळ उपकेंद्राची केली पाहणी :**

अमरावती परिमंडलातील मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० मध्ये निवडण्यात आलेल्या बाभुळगाव तालुक्यातील ३३ केव्ही घारफळ उपकेंद्रास संचालक (संचालन) श्री. संजय ताकसांडे यांनी भेट दिली. घारफळ ग्रामपंचायतीअंतर्गत शासनाने १२.३५ एकर जागा उपलब्ध करून दिली आहे. या जागेवर जवळपास २.५ मेगावॅट वीज निर्मिती होणार असून संबंधित सौर कृषी वाहिनी तयार झाल्यानंतर घारफळ उपकेंद्रांतर्गत १२ गावांतील सुमारे ८०२ कृषिपंप ग्राहकांना दिवसा वीजपुरवठा होणार आहे. या योजनेअंतर्गत प्रथम टप्प्यात यवतमाळ जिल्ह्यातील ४९ उपकेंद्रांचा समावेश करण्यात आलेला आहे. घारफळसह जिल्ह्यात आणखी ४८ उपकेंद्राच्या सक्षमीकरणाचे काम सुरू आहे.

**आन्वा येथील ३३ केव्ही उपकेंद्रास भेट :**



आन्वा येथील ३३ केव्ही उपकेंद्राची पाहणी करताना संचालक (संचालन) श्री.संजय ताकसांडे.

छत्रपती संभाजीनगर परिमंडलांतर्गत मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना-२.० मध्ये निवडलेल्या आन्वा (ता.भोकरदन जि.जालना) येथील ३३ केव्ही उपकेंद्राची निवड करण्यात आलेली आहे. संचालक (संचालन) श्री.संजय ताकसांडे यांनी या उपकेंद्रास भेट देऊन पाहणी केली. यावेळी जालना मंडलाचे अधीक्षक अभियंता श्री.संजय सरग उपस्थित होते.

आन्वा ग्रामपंचायतीअंतर्गत शासनाने उपलब्ध करून दिलेल्या १०० एकर जागेवर जवळपास १५ मेगावॅट वीज निर्मिती होणार असून आन्वा उपकेंद्रांतर्गत जवळपास १४ गावांतील सुमारे ४ हजार कृषिपंप ग्राहकांना दिवसा शाश्वत वीजपुरवठा होणार आहे. या योजनेअंतर्गत प्रथम टप्प्यात जालना जिल्ह्यातील २१ उपकेंद्रांचा समावेश आहे. ■

# वीज ग्राहकांना दर्जेदार गुणवत्तापूर्ण सेवा देण्यासाठी सदैव तत्पर रहा– श्री. लोकेश चंद्र

## सबऑर्डीनेट इंजिनियर्स असोसिएशन संघटनेच्यावतीने ''इंजिनियर्स डे'' साजरा



''इंजिनियर्स डे'' निमित्त मार्गदर्शन करताना अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र सोबत उपस्थित मान्यवर.

**वीज** ग्राहकांना दर्जेदार, सुरळित अखंडित व गुणवत्तापूर्ण सेवा देण्यासाठी वीज ग्राहकांना नवीन वीज जोडण्या देणे, ग्राहक तक्रारींचे वेळेत समाधान करणे, वीज गळती कमी करून महसूलात वाढ करणे, पायाभुत सुविधांची कामे निर्धारित वेळेत दर्जेदार करणे आदी सेवा ग्राहकांना दिल्यास ग्राहक समाधानी होईल. कंपनीच्या प्रगतीचा आलेख उंचावण्यासाठी वीज अभियंता व कर्मचाऱ्यांनी सतत प्रयत्नशिल राहण्याचे आवाहन अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी केले.

सबऑर्डीनेट इंजिनियर्स असोसिएशन संघटनेच्यावतीने भारतरत्न सर मोक्षगुंडम विसवेश्वरया यांच्या जयंतीनिमित्त ''इंजिनियर्स डे'' संत तुकाराम नाट्यगृह औरंगाबाद येथे साजरा करण्यात आला. त्या प्रसंगी ते बोलत होते.

या कार्यक्रमास औरंगाबाद प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक श्री. प्रकाश खपले, संचालक (संचालन) श्री संजय ताकसांडे, संचालक (मासं) श्री. अरविंद भादीकर, औरंगाबाद परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री मुरहरी केळे, लातूर परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री सुंदर लटपटे, नांदेड परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. अनिल डोये, मुख्य कार्यालयातील मुख्य अभियंता श्री. भुजंग खंदारे, महापारेषण औरंगाबादचे मुख्य अभियंता श्री. अविनाश निंबाळकर, सबऑर्डीनेट इंजिनियर्स असोसिएशन संघटनेचे अध्यक्ष श्री. केदार रेलेकर, उपाध्यक्ष श्री. राजाराम शितोळे, सरचिटणीस श्री. संतोष खुमकर यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

बदली धोरण, पदोन्नतीचे प्रश्न, सामान्य आदेश आदी कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडविण्याचे आवाहन श्री. लोकेश चंद्र यांनी याप्रसंगी केले. तसेच अभियंता, कर्मचारी यांना कंपनीच्या प्रगतीसाठी नवीन तंत्रज्ञान अवगत करण्यासाठी जागतिक स्तरावरील तांत्रिक प्रशिक्षणासाठी पाठविण्याचे आश्वासन देवून या नवीन प्रशिक्षण तंत्राचा अवलंब कंपनीच्या प्रगतीसाठी करण्याचे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले. ■

# ग्राहकांना सर्वोत्तम सेवा देण्याबरोबरच वीजबिल वसुलीवरही भर द्या

## अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र

**वीज** ही मूलभूत गरज असल्याने ग्राहकांना सर्वोत्तम सेवा द्या. त्यांच्या तक्रारींचा वेळीच निपटारा करा. याबरोबरच थकित वीजबिल वसुलीसही प्राधान्य द्या, असे निर्देश अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी दिले. छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक कार्यालयांतर्गत असलेल्या छत्रपती संभाजीनगर, लातूर व नांदेड या तिन्ही परिमंडलाच्या संयुक्त आढावा बैठकीप्रसंगी ते बोलत होते.

श्री. लोकेश चंद्र म्हणाले की, पायाभूत सुविधांची गरज नसलेल्या भागात २४ ते ४८ तासात नवीन वीज जोडणी देण्यावर भर देतानाच विश्वसनीय आणि दर्जेदार वीजपुरवठ्यासाठी आपण सर्वांनी तत्पर असणे आवश्यक आहे. प्रलंबित कामांचा तातडीने निपटारा करून ग्राहक सेवा उंचावण्याचे आवाहनही त्यांनी केले. यावेळी त्यांनी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत सौर कृषी प्रकल्पांसाठी जिल्हानिहाय उपलब्ध झालेल्या जागा, त्यासाठी करावयाच्या आवश्यक उपाययोजना याचसोबतच प्रलंबित नवीन वीज जोडण्या, इज ऑफ लिव्हिंग, डिजिटल पेमेंट, आरडीएसएस आदी विषयांचा परिमंडलनिहाय आढावा घेतला. अचूक वीजबिल दिल्यास मोठ्या प्रमाणात ग्राहकांच्या तक्रारी कमी होतील. यावर सर्वांनी लक्ष केंद्रित करण्याचे निर्देश दिले. प्रादेशिक कार्यक्षेत्रात मागील काही दिवसांत रोहित्रे नादुरुस्त होण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात कमी झाले असून महसूल वसुलीत अजूनही चांगले काम करण्यास संधी असल्याचे ते म्हणाले.

यावेळी 'मसिआ' या उद्योजकांच्या संघटनेच्या शिष्टमंडळासोबतही श्री. लोकेश चंद्र यांनी बैठक घेतली. छत्रपती संभाजीनगर शहर व आसपासच्या भागात वाढणाऱ्या उद्योगांचे विजेचे प्रश्न सोडवण्याची मागणी शिष्टमंडळाने केली. यावर श्री. लोकेश चंद्र यांनी काही प्रश्नांवर तातडीने तोडगा काढत आगामी काळात उर्वरित प्रश्नही मार्गी लावण्याचे आश्वासन दिले. तसेच या परिसरात भविष्यातील




आढावा बैठकीला मार्गदर्शन करताना अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री.लोकेश चंद्र. सोबत संचालक (संचालन) श्री. संजय ताकसांडे, संचालक (मानव संसाधन) श्री.अरविंद भादीकर, सहव्यवस्थापकीय संचालक श्री. प्रकाश खपले.

उद्योगांच्या वाढीच्या पार्श्वभूमीवर पायाभूत सुविधा उभारण्याचे उद्योजकांनी प्रस्ताव द्यावेत. यासाठी निधी देऊन कामे पूर्ण करू, अशी ग्वाही त्यांनी दिली. या बैठकीला छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक श्री. प्रकाश खपले, संचालक (संचालन) श्री. संजय ताकसांडे, संचालक (मानव संसाधन) श्री. अरविंद भादीकर, मुख्य अभियंता सर्वश्री भुजंग खंदारे (सांघिक कार्यालय), डॉ. मुरहरी केळे (छत्रपती संभाजीनगर), सुंदर लटपटे (लातूर परिमंडल), अनिल डोये (नांदेड परिमंडल), संजय पाटील (प्र.), विशेष कार्यकारी अधिकारी श्री. मंगेश कोहट यांच्यासह छत्रपती संभाजीनगर, लातूर व नांदेड या तिन्ही परिमंडलातील सर्व अधीक्षक अभियंते व कार्यकारी अभियंते उपस्थित होते. ■

# वीज कर्मचाऱ्यांच्या दैनंदिन कर्तव्याची जाणीव करून देणारा सुंदर देखावा









**महाराष्ट्रात** गणेशोत्सवाचा सण खूप उत्साहाने साजरा केला जातो. गणेशोत्सवासाठी सार्वजनिक गणेश मंडळे सुंदर व वेगवेगळ्या संकल्पनेवर आधारित सुंदर सजावट प्रदर्शित करतात. पण आजकाल घरगुती प्रतिष्ठापणा करण्यात येणाऱ्या गणेश सजावटही पाहण्यासारखी असते. अशीच एक लक्ष वेधून घेणारी सजावट भांडूप विभागांतर्गत पाचपाखाडी शाखा येथील वरिष्ठ तंत्रज्ञ म्हणून काम करणारे श्री.महेश शिंदखेडे यांनी केली. त्यांनी आपल्या दैनंदिन कामाची ओळख गणेशोत्सवाच्या देखाव्यातून सर्वांना करून दिली. कार्यालयीन काम सांभाळून, रात्री दोन महिने काम करून त्यांनी एक सुंदर व सर्जनशील देखावा तयार केला होता.



श्री.महेश शिंदखेडे

कोरोना काळात अत्यवाश्यक सेवे मधील डॉक्टर व पोलिसांना सर्वांनी सलाम केले. पण आपल्या जीवाची पर्वा न करता ज्यांनी ग्राहकांना उत्तम व अखंडित वीज सेवा देणारा वीज कर्मचारी कोणत्याही अपेक्षेशिवाय त्या काळातही कष्ट करत राहिला. अशी सर्व परिस्थिती अनुभवलेले वीज कर्मचारी श्री. महेश शिंदखेडे यांनी आपल्या घरच्या पाच दिवसाच्या गणेशोत्सवाच्या सजावटीसाठी वीज कर्मचाऱ्यांबद्दल एक सुंदर देखावा तयार केला होता. यामध्ये वीज कर्मचाऱ्यांच्या दैनंदिन कामाबाबत तसेच त्यांच्या कामाशी निगडित संभाव्य धोके आणि त्यांच्या कामाचे महत्त्व याविषयी लोकांना जागरूक करण्यासाठी देखावा तयार केला. मीटर रीडिंग, पोलवर काम करणे, वीज कनेक्शन चेक करणे, वीजबिल वसुली, तांत्रिक बिगाड असलेल्या यंत्रणाची दुरुस्ती करत असलेल्या वीज कर्मचाऱ्याच्या गणवेशात उंदीर दाखवला होता.

याबाबत ते म्हणाले की, खूप ठिकाणी बरेच वर्षापासून बघत आलोय भरपूर प्रकारचे डेकोरेशन बघण्यात आले आहे पण महावितरणचे डेकोरेशन आजपर्यंत कोणी केले नाही. त्यासाठी मी हे डेकोरेशन बनवले आहे जेणेकरून लोकांना कळावे की आपले कर्मचारी काय काम करतात? त्या लोकांच्या जीवाला किती धोका असतो, हे लोकांपर्यंत पोहोचले पाहिजे यासाठी मी गणपती डेकोरेशनमध्ये हा देखावा केला.

श्री. शिंदखेडे यांच्या घरी त्यांच्या मित्र परिवाराशिवाय इतर लोकांची गर्दी या देखाव्याला बघण्यासाठी असायची. लोकांनी त्यांच्या सजावटीचे तसेच त्यांच्या कामाचे भरभरून कौतुक केले. श्री. महेश शिंदखेडे यांच्या गणेशोत्सवाच्या देखाव्या बद्दल वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सुद्धा त्यांचे भरभरून कौतुक केले. ■

# कामाच्या गुणवत्तेशी तडजोड स्विकारली जाणार नाही– श्री.दत्तात्रय पडळकर

**अकोला** परिमंडलात सुरू असलेली आरडीएसएस योजनेतील वाहिनी विलगीकरणाची कामे तसेच यापुढे होणारी यंत्रणा सक्षमीकरणची, विस्तारीकरणाची आणि पायाभूत विकासाची संपूर्ण कामे ही निश्चित केलेल्या गुणवत्तेनुसारच व्हावीत. तसेच कामाच्या गुणवत्तेसोबत कोणत्याच पातळीवर तडजोड स्विकारली जाणार नाही असे प्रतिपादन मुख्य अभियंता श्री. दत्तात्रय पडळकर यांनी केले. विद्युत भवन अकोला येथे पायाभूत आराखडा विभाग आणि परिमंडलात आर.डी.एस.एस. योजनेचे काम कर्मचार्यांसाठी आयोजित संयुक्त कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी अधीक्षक अभियंता पायाभूत आराखडा श्री. अनिल वाकोडे, अधीक्षक अभियंता श्री. पवनकुमार कछोट व कार्यशाळेचे मार्गदर्शक श्री. सागर आष्टनकर यांची उपस्थिती होती.

यावेळी वीज क्षेत्रातील बदलते तंत्रज्ञान, कामाचे बदलते तपशील लक्षात घेऊन कामाची गुणवत्ता, सुरक्षितता आणि स्टॅंर्डड मेथड ऑफ कंन्स्ट्रक्शन कसे असावे याबाबत या कार्यशाळेत अभियंता श्री. आष्टनकर यांच्याकडून तपशीलवार सादरीकरण करून माहिती देण्यात आली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्रीमती यामिनी पिंपळे यानी मानले. ■



कार्यक्रमास उपस्थित मुख्य अभियंता श्री. दत्तात्रय पडळकर व इतर मान्यवर.

# आर.डी.एस.एस. योजनेतील कामे उदीष्टानुसारच पुर्ण करा- श्री. प्रसाद रेशमे



कान्हेरी सरप या शिवारातील उपकेंद्राची पाहणी करताना संचालक (प्रकल्प) श्री.प्रसाद रेशमे, सोबत मान्यवर.

**महावितरणच्या** आर.डी.एस.एस. योजनेअंतर्गत परिमंडलात वीज यंत्रणा विस्तारीकरण आणि सक्षमीकरणासाठी सुरू करण्यात आलेली कामे ही दिलेल्या माईलस्टोन नुसारच पुर्ण करण्यात यावित, शिवाय महावितरणने निश्चित केलेल्या साहित्याच्या आणि कामाच्या गुणवत्तेतनुसारच काम करण्याचे निर्देश संचालक (प्रकल्प) श्री. प्रसाद रेशमे यांनी दिले.

विद्युत भवन अकोला येथे घेण्यात आलेल्या कंत्राटदार यांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी अधीक्षक अभियंता (पा.आ.) श्री. अनिल वाकोडे, कार्यकारी अभियंते सर्वश्री ज्ञानेश पानपाटील, जयंत पैकीने, विजयकुमार कासट, अनिल उईके, अशोका बिल्डकॉन आणि श्रीम ईलेक्ट्रीकल्स प्रायव्हेट लिमिटेड कंत्राटदार एजन्सीजचे प्रतिनिधी आणि पायाभूत आराखडा विभागाच्या श्रीमती यामिनी पिंपळे, सर्वश्री निखिल खोर, अमोल लखडे, अविनाश पाटील, शैलेश देशमुख आदी उपस्थित होते.

यावेळी, जुलै २०२५ पर्यंत परिमंडलातील १७८ फिडरच्या विलगीकरणाचे काम पुर्ण करण्याचे उदिष्ट निश्चित केल्यानुसार हे काम वेळेत आणि दिलेल्या माईलस्टोन नुसार पुर्ण करण्याचे निर्देश संचालक प्रकल्प श्री. प्रसाद रेशमे यांनी यावेळी दिलेत.

**शेतीसाठी दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी फिडर सेपरेशन:**

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेत कृषी फिडरच्या माध्यमातून शेतीसाठी शाश्वत आणि दिवसा वीज देण्याचे नियोजन आहे. अकोला परिमंडलात आर. डी.एस.योजनेत १७८ कृषी फिडर तयार करण्यात येणार आहेत. २६२ कोटी रूपये या योजनेत खर्च होणार आहे. यामध्ये अकोला जिल्हा ९६, बुलडाणा ६३ आणि वाशिम जिल्ह्यातील १९ फिडरचा समावेश आहे. विशेषता शेतीसाठी वीज पुरवठा करतांना व्होल्टेज कमी जास्त होऊ नये यासाठी परिमंडलात ९९ ठिकाणी उपकेंद्रात कॅपेसिटर बँक बसविण्याचे व अनुषंगिक काम सुरू करण्यात आले आहे. १९ कोटी रुपये खर्च करून करण्यात येणाऱ्या या कामामुळे पॉवर फॅक्टरमध्ये सुधारणा होणार आहे.

**गुणवत्ता व साहित्याची पाहणी:**

विस्तारीकरण आणि सक्षमीकरणाच्या या कामात निश्चित केलेल्या साहित्याच्या आणि गुणवत्तेनुसारच होणे गरजेचे आहे.तसेच झालेल्या कामाचा दर्जा आणि गुणवत्ता मुख्य कार्यालयामार्फत पडताळणी करण्यात येणार असल्याचे यावेळी संचालक प्रकल्प प्रसाद रेशमे यांनी सांगीतले. रूफ टॉप योजनेमुळे ग्राहकाचे वीज बिल कमी होणार आहे. शिवाय या योजनेत सहभागी होऊन सोलर रूफ टॉप बसविण्यासाठी ४० टक्क्यापर्यंत सबसिडी दिली आहे. त्यामुळे ही योजना परिमंडलात सर्वसामान्यांपर्यंत पोहचवून त्यांना या योजनेत सामिल करून घेण्याचे निर्देश संचालक प्रकल्प श्री.प्रसाद रेशमे यांनी यावेळी दिले.



३३ केव्ही खापा उपकेंद्रातील १.२ एमव्हीएच्या कॅपेसिटर बँकेची पाहणी करतांना संचालक (प्रकल्प) प्रसाद रेशमे, सोबत मान्यवर.

**नागपूर परिमंडलाचाही आढावा**

विद्युत भवन, नागपूर येथे प्रसाद रेशमे यांनी वाहिनी विलगीकरण, उपरी वाहीन्यांचे भुमिगत वीज वाहिन्यांमध्ये रुपांतरण आणि कॅपेसिटर बँक बसविण्याच्या कामांचा विस्तृत आढावा घेतला. या बैठकीला नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री.दिलीप दोडके, अधीक्षक अभियंते सर्वश्री अमित परांजपे, राजेश नाईक व अजय खोब्रागडे कार्यकारी अभियंते राजेश घाटोळे, समीर शेंद्रे, श्रीमती दिपाली माडेलवार आदी उपस्थित होते.

नागपूर परिमंडलात खापा उपकेंद्रासोबतच पारशिवनी उपकेंद्र आणि वर्धा मंडला अंतर्गत आर्वी उपविभागातील सावळी, हेटीकुंडी, अंतोरा आणि विजयगोपाल उपकेंद्रात प्रत्येकी १.२ एमव्हीएआर क्षमतेच्या कॅपेसिटर बँक बसविण्यात आला आहे. यावेळी प्रसाद रेशमे यांनी आणि रिऍक्टिव्ह पॉवर मॅनेजमेंट अंतर्गत वीज यंत्रणा विकास निधी योजनेतील प्रकल्पाच्या कामाचा देखील आढावा घेतला. ■

# मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० चा कर्नाटक राज्याकडून अभ्यास



कर्नाटकच्या शिष्टमंडळास योजनेविषयी मार्गदर्शन करताना अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक श्री.लोकेश चंद्र सोबत मान्यवर.

**शेतकऱ्यांना** दिवसा व भरवशाचा वीज पुरवठा करण्यासाठी सौर ऊर्जेचा वापर करून ७००० मेगावॅट वीजनिर्मिती करण्याच्या महत्त्वाकांक्षी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० चा अभ्यास करण्यासाठी नुकतीच कर्नाटकच्या ऊर्जा सचिवांसह वीज कंपन्यांच्या प्रमुखांनी मुंबई, नागपूर व पुण्याला भेट दिली. महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी कर्नाटकच्या शिष्टमंडळास योजनेविषयी मार्गदर्शन केले.

कर्नाटकचे अतिरिक्त मुख्य सचिव (ऊर्जा) श्री. गौरव गुप्ता यांच्या नेतृत्वाखालील या शिष्टमंडळात कर्नाटक पॉवर ट्रान्समिशन कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक श्री. पंकज कुमार पांडे, बंगलोर इलेक्ट्रिसिटी सप्लाय कंपनी लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक श्री. महांतेश बिळागी, कर्नाटक रिन्युएबल एनर्जी डेव्हलपमेंट लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक श्री. के.पी.रुद्रप्पैया, हुबळी इलेक्ट्रिसिटी सप्लाय कंपनी लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक श्री. मोहंमद रोशन, गुलबर्गा इलेक्ट्रिसिटी सप्लाय कंपनी लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक श्री. रविंद्र करिलिंगण्णावार आणि मंगलोर इलेक्ट्रिसिटी कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालक श्रीमती पद्मावती यांचा समावेश होता.

उपमुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने राज्यात शेतकऱ्यांसाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० सुरू करण्यात आली असून योजनेच्या अंमलबजावणीसाठी त्यांचे पाठबळ आहे. राज्याच्या प्रधान सचिव (ऊर्जा) श्रीमती आभा शुक्ला यांच्या मार्गदर्शनात योजनेची अंमबजावणी करण्यात येत आहे. शेतकऱ्यांना दिवसा भरवशाचा वीज पुरवठा करण्यासोबत क्रॉस सबसिडीचा बोजा कमी करून उद्योगांसाठीच्या वीज दरात भविष्यात कपात करण्याची संधी देणारी ही संपूर्ण देशातील अभिनव योजना आहे. या योजनेमुळे राज्यात खासगी क्षेत्रातून ३० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होईल व हजारो रोजगार निर्माण होतील.

मुख्यमंत्री मा. श्री. एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाने मंजुरी दिल्यानंतर उपमुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते दि. २४ एप्रिल रोजी राज्यात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० सुरू करण्यात आली. या योजनेसाठी अल्पावधीत सार्वजनिक जमीन उपलब्ध केली असून सुमारे ३५०० मेगावॅट वीजनिर्मिती लवकरच सुरू होणार आहे. केंद्र शासनाने मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० ची प्रशंसा केली आहे. केंद्र सरकारच्या कुसूम सी योजनेची मार्गदर्शक तत्त्वे या योजनेच्या आधारे तयार केली आहेत व ती देशभर लागू करण्यात येत आहेत.

मुंबई येथे महावितरणच्या मुख्यालयात श्री. लोकेश चंद्र यांनी कर्नाटकच्या शिष्टमंडळाला मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेची धोरणात्मक वैशिष्ट्ये समजावून सांगितली, योजनेच्या अंमलबजावणीबद्दल माहिती दिली तसेच शिष्टमंडळाच्या शंकांचे निरसन केले. राज्याचा ऊर्जा विभाग, महसूल विभाग आणि महावितरणने समन्वयाने योजनेच्या अंमलबजावणीसाठी खूप चांगली कामगिरी केली आहे. मा. उपमुख्यमंत्र्यांनी डिसेंबर २०२५ पर्यंत राज्यातील किमान ३० टक्के कृषी फीडर सौर ऊर्जेवर चालविण्याचे मिशन २०२५ निश्चित केले असून ते गाठण्यासाठी प्रयत्न चालू असल्याचे ते म्हणाले. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेसोबत कर्नाटकच्या शिष्टमंडळाने महावितरणने राबविलेल्या एक लाख सौर कृषी पंप योजनेची माहिती घेतली. या योजनेचे स्वरुप काय होते, त्याच्या अंमलबजावणीत कोणत्या अडचणी आल्या व त्यांचे निराकरण कसे केले याची माहिती शिष्टमंडळाने घेतली. कुसूम सी या केंद्र सरकारच्या सौर कृषी पंप योजनेची अंमलबजावणी महावितरणकडून लवकरच करण्यात येणार आहे, त्या संदर्भात महावितरणने केलेल्या तयारीची माहिती त्यांनी घेतली. मुंबईमध्ये महावितरणचे अध्यक्ष आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा केल्यानंतर शिष्टमंडळाच्या सदस्यांनी नागपूर व पुणे येथे शेतकऱ्यांसाठीच्या सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पांना तसेच सौर कृषी पंपांना भेट दिली. ■

Printed & Published by Shri. Bharat Pawar of Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd. Printed at Jyotirling Enterprises, 315 - B. Deen Bldg. Compound, Shop No. 32, N. M. Joshi Marg, Lower Parel (E), Mumbai - 400 011. Tel. No.: 2300 2574 & Published at Hongkong Bank Bldg, M. G. Road, Fort, Mumbai - 400 001.
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.

संपादक : श्री. भारत पवार उपसंपादक : श्री. विश्वजीत भोसले
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महावितरण विद्युत वार्ता
प्रकाशगड, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०० ०५१.
(खाजगी वितरणासाठी)